# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक १७/०७/२०२२ (रविवार)

---

### कळमेश्वर हद्दीत निर्माणाधीन उडान पुलाचे साहीत्य चोरी करणारे ०४ आरोपी अटकेत
### एकुण १,७३,५००/— रू चा माल जप्त
### स्थानिक गुन्हे शाखेची कारर्वाई

दिनांक १६.०७.२२ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पोलीस स्टेशन कळमेश्वर हद्दीत पेट्रोलिंग कामी फिरत असतांना मुखबिरद्वारे खात्रीशीर माहीती मिळाली कि, कळमेश्वर काटोल रोडवरील रेल्वे गेट येथील निर्माणाधीन उडान पुलाचे बांधकामाचे लोखंडी रॉड दहेगाव येथे राहणारे प्रमोद मानकर, रिंकु यादव, प्रविण पाटील व त्यांचे ईतर साथीदारांनी चोरी करून रेल्वे गेट जवळील झाडीमध्ये लपवुन ठेवले आहे. व सदरचे साहीत्य कबाडी दुकानदारास विक्री करण्याकरीता घेवुन जाणार आहे. अश्या खबरेवरून आम्ही कळमेश्वर गेटजवळ वाट पाहत लपुन राहीलो. काही वेळानंतर तेथे दोन मोटर सायकलवर बसुन ०६ लोक आले. ते आपसात चर्चा करून रेल्वे गेटच्या बाजुने रेल्वे पटरीकडील पुलाजवळ गेले. व थोड्या वेळाने परत आले तेव्हा त्यांचे हातामध्ये पुलाचे बांधकामाकरीता लागणारे लोखंडी रॉड दिसुन आले. स्टॉफसह त्यांचेकडे धाव घेतली असता दोन इसम पळुन गेले. व चार इसमांना पकडले, त्यांना ताब्यात घेवुन सखोल विचारपुस केली. त्यांनी आपले नाव खालीलप्रमाणे सांगितले :—

१.प्रमोद दशरथ मानकर वय ३५ वर्ष रा वार्ड क्र २, दहेगाव तह कळमेश्वर जि नागपुर

२.गणेश मत्रु धुर्वे वय २८ वर्ष रा. फगनुटोला, पोस्ट धनेगाव, तह बिछवा जि छिंदवाडा मध्यप्रदेश

३.डिंगाबर हेमराज कोहळे वय ३० वर्ष रा फत्तेपुर पोस्ट डोंगरगाव तह जि गोंदीया

४. बंटी रतन नितनवरे वय २९ वर्ष रा वार्ड क्र. २ दहेगाव तह कळमेश्वर

**पळुन गेलेले आरोपी नामे** — ५. प्रविण उर्फ ढेब्या खेमराज पाटील वय अंदाजे ३० वर्ष रा दहेगाव तह कळमेश्वर ६. रिंकु रामसिंग यादव वय ३२ वर्ष रा दहेगाव तह कळमेश्वर

वरील ताब्यात घेतलेल्या आरोपीतांनी उडान पुलाचे बांधकामाकरीता वापरण्यात येणारे लोंखंडी साहीत्य व रॉड चोरी केल्याचे कबुल केले आहे.

सदर आरोपीतांकडुन लोखंडी रॉड, पाईप, सेट्रींग प्लेट किमती ३८,५००रू चा माल तसेच चोरी करण्याकरीता वापरलेली दोन मोटर सायकल कि १,००,०००/—रू व ३ मोबाइल संच कि ३५,०००/— असा एकुण १,७३,५००/— रू चा माल हस्तगत केला आहे. पुढील तपास पोलीस स्टेशन कळमेश्वर करीत आहे.

सदरची कारवाई नागपुर ग्रामीण चे पोलीस अधिक्षक श्री विजयकुमार मगर, अपर पोलीस अधिक्षक श्री राहुल माकणीकर, यांचे आदेशाने स्थानीक गून्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि जितेंद्र वैरागडे, पोउपनि भारत थिटे, सफौ चंद्रशेखर गडेकर, पोहवा निलेश बर्वे, दिनेश आधापुरे, राजेंद्र सनोडीया, गजेंद्र चौधरी, पोना अमोल वाघ, महेश बिसेन, अजीज दुधकनोज, चालक पोशि आशुतोष लांजेवार सर्व नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांचे पथकान केली आहे.

## मोटरपंपचे स्टार्टर चोरी करणा–या आरोपीविरूध्द कारवाई

**१.पोलीस स्टेशन अरोली :–** अंतर्गत कोदामेंढी शेतशिवार ४ किमी पुर्व. येथे दिनांक १६/०७/२२ चे १८/२० वा. यातील फिर्यादी चे शेतातुन आरोपी क्र. **१) कैलास रामेश्वर गुरनुले ४५ वर्ष २) रमेश श्रीराम मोहुर्ले ४७ वर्ष दोन्ही रा.कोदामेंढी** यांनी पाण्याची मोटारचे चालु करण्याचे स्टार्टर ४ नग किमती ४,०००/– चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– भगवान फागोजी बावणकुळे वय ४८ वर्ष रा.क़ोदामेंढी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. अरोली येथे नमुद दोन्ही आरोपीविरूध्द कलम ३७९,३४ भादवि अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास– सफौ.गणेश रॉय मो.न.७८२०८९७१२० हे करीत आहे.

## बैल चोरी

**१.पोलीस स्टेशन बोरी :–** अंतर्गत मौजा आसोला सावंगी १२ किमी दक्षीण. यातील फिर्यादी यांने आपली बैलजोडी घरासमोर आंगणात बांधुन ठेवली होती. दि. १६.०७.२२ रोजी रात्री ०१.३० वा. दर. नवनाथ राउत हे घरी आले व सांगीतले की, कोणीतरी तुमचे बैल चोरुन नेत आहे. तेव्हा फिर्यादी व घरचे सर्व बाहेर आलो असता रोडवर एक स्कॉरपीओ व एक छोटा हाथी गाडी मध्ये फिर्यादीचा १ बैल किं. ५०,००० रु. चा अज्ञात चोरांनी गाडीत टाकुन पळून गेले. फिर्यादी यांनी गाडीचा पाठलाग केला, परंतु गाडी कुठेही मिळून आली नाही.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– गंगाधर तानबाजी सहारे वय ५० रा. आसोला सावंगी ता. हिंगणा जि. नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३७९ भादवि अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास– पो हवा १७१ असलम पो.स्टे. बोरी मो.क्रं. ८६६८८१६०४९ हे करीत आहे.

## दुखापत

**१.पोलीस स्टेशन अरोली :–** अंतर्गत अरोली टाउन. येथे दिनांक १६/०७/२०२२ चे १४/०० वा. यातील यातील आरोपी कैलास रामलाल धुर्वे वय ४५ वर्ष रा.अरोली याने त्याची बहीण नामे– ग.भा.कमलाबाई रामलाल धुर्वे वय ६५ वर्ष रा.अरोली ही आपले घरी पोते घेवुन येत असता काही न बोलता आरोपी याने लाकडी काठीने डोक्यावर व हाताचे दंडावर मारूण गंभीर जखमी केले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– ग.भा.कमलाबाई रामलाल धुर्वे वय ६५ वर्ष रा.अरोली यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. अरोली येथे नमुद आरोपीविरूध्द कलम ३२६ भादवि अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास– स फौ टिकाराम जाधव ८८३०९६५३४७ हे करीत आहे.

## मोटर सायकलने पाठलाग करून चाकुने दुखापत करून जिवे मारण्याची धमकी

**१.पोलीस स्टेशन मौदा :—** अंतर्गत शिंगोरी. येथे फिर्यादी पिडीता ही आपले मोपेड गाडी ने नागपुर वरून भंडारा येथे येत असता दिनांक १५/७/२२ चे १८/३० वा. दरम्यान यातील आरोपी १) नंदु बांगाळकर रा. भंडारा २) बालु विठ्ठल गायधने रा भंडारा यांनी मोटर सायकल ने पिडीताचा पाठलाग करून व आरोपी क्र १ ने फिर्यादीच्या डाव्या हाताच्या तळहातावर चाकुने मारले व फिर्यादीस शिवीगाळी करून जिवे मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी पिडीता यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे नमुद आरोपीविरूध्द कलम ३५४ (ड), ३२४,५०४, ५०६, ३४ भादवी अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास— स फौ ४५ देशमुख पो.स्टे. मौदा हे करीत आहे.

## फुस लावुन पळवुन नेणा—या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद

**१.पोलीस स्टेशन कोंढाळी :—** अंतर्गत मौजा बाजारगाव येथील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी वय १७ वर्ष हीला आरोपी नामे —सुनील तूरणकर वय ३० वर्ष रा धामणा याने दिनांक १५/०७/२२ चे ०७/०० वा ते १८/०० वा दरम्यान आमीश दाखवून फिर्यादीचे कायदेशिर रखवालीतून फूस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी पिडीता यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कोंढाळी येथे नमुद आरोपीविरूध्द कलम ३६३ भादवी अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास— स फौ ४५ देशमुख पो.स्टे. मौदा हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

**पोलीस स्टेशन कन्हान :—** अंतर्गत बंद टोल नाका एनएचए रोड वराडा शिवार कन्हान पारशिवनी. येथे यातील फिर्यादी व फिर्यादी चे मित्र पवण लक्ष्मण ढोरे हे दोघेही मोटर सायकल ने एन एच—७ ए रोड ने जात असता बंद टोल नाका जवळ ट्रक क्र. एपी—१६ टी एफ—९५४९ चा चालक नामे— डी नानी नागार्जून रा. आंध्रप्रदेश याने आपल्या ताब्यातील वाहण यु टर्न घेत असता भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन वरील मोटर सायकल ला जोरदार धडक दिल्याने फिर्यादी व त्याच्या मित्राच्या डोक्याला जास्त मार लागला असुन मित्र पवण लक्ष्मण ढोरे याचा मेयो हॉस्पीटल येथे उपचारा दरम्यान मृत्यु झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी भुषण पुरूषोत्तम बावणे वय ३३ वर्ष रा. आयाचित मंदीर कुणबी पुरा महाल रोड नागपुर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरूध्द कलम २७९,३३८, ३०४(अ) भादवी सह १८४ मोवाका. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास— पो.हवा अरूण सहारे मो.न. ९३०९५९२५१२ हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यु

**पोलीस स्टेशन कळमेश्वर :–** अंतर्गत माहुरझरी गावाजवळील तलाव १४ किमी पुर्व, दिनांक १६/०७/२०२२ चे १३/३० वा. यातील फिर्यादीचा मुलगा नामे – मृतक बबलु जेठु अचारकटीया हा तलावात पोहण्याकरीता गेला असता तलावाच्या पाण्यात बुडुन मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरून पोस्टे कळमेश्वर येथे कलम १७४ जाफौ अन्वयें मर्ग दाखल करण्यात आला. सदर मर्ग चा पुढील तपास– सफौ, रूडे मो ९९२३३५२६४६ हे करीत आहे.

**पोलीस उपनिरीक्षक भारत थिटे**
**मो क्र ९४२२६१४६३३**
**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण),नागपुर**